Golden Research Thoughts
Vol -1 , ISSUE –4, October - 2011
ISSN:- 2231-5063
Available online at www.aygrt.org

ORIGINAL ARTICLE

भारतीय लोकशाही : एक अद्वितीय शासन पध्दती

देवलाल सुखदेवराव आठवले

श्रीमती कोकीळाबाई गावंडे महीला महाविद्यालय, दर्यापूर
जि.अमरावती(महाराष्ट्र)

प्रस्तावना :-

हेरोडोटच्या काळापासून लोकशाही हा शब्द अशा शासन प्रणाली साठी वापरला जात की, जी कायद्याच्या दृष्टीकोनातुन राज्याची संपुर्ण सत्ता ही जन सामान्याच्या हातात असते. प्लेटो व अरीस्टॅटोलच्या काळात लोकशाही या संपल्पनेमध्ये स्वतंत्र्य जनांचे, समान सहभागीता आणि निर्णयापुर्वी स्वतंत्र्य वादवीवाद ह्या कायद्याप्रती आदरभाव ह्या बाबी त्या काळातल्या लोकशाहीत अस्तीत्वात होत्या. लोकशाही शासन पध्दती ही साधारणा तीन सहस्त्राब्दीपासून अस्तीत्वात आहे आणि या कालावधीत ती अनेकदा अनेक स्वरुपात राबवीण्यात आली आहे.

आपण भारतीय लोकशाहीचे अन्य लोकशाही सोबत जेंव्हा तुलना करतो तेंव्हा भारतीय लोकशाहीचे वेगळेपण आपल्याला दिसुन येते. महात्मागांधीनी अंहिसेचा वापर करुन भारतात लोकशाही रुजवीली तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी संवीधानाच्या माध्यमातुन भारतात लोकशाहीची मुल्ये सर्व भारतीयांना प्रदान केली. पंडीत जवाहरलाल नेहरु पंतप्रधान असतांना त्यांनी लोकशाहीला अशा आकृतीबंधात स्थापीत केली की, ती लोकशाही सतत विकासाभिमुख राहील.

भारत स्वतंत्र्य व संप्रभु १५ ऑगस्ट १९४७ ला झाला व भारताला कायद्याचे राज्य बनवीण्यासाठी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली संविधान सभेची स्थापना करण्यात आली. याच संवीधान सभेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मसुधा समीतीचे अध्यक्ष नियुक्त करुन संवीधान निर्मीतीचे उत्तरदायीत्व सोपवीले.

भारतातीय लोकशाही व लोकशाही व्यवस्था ही एक कुतहलाची व आश्चर्याची बाब यासाठी आहे की, अर्थ्या शतकातच भारत हा दुर्बल असलेला देश महाशक्ती बनला अन्नधान्याची टंचाईग्रस्त भारत गरीबी दरीद्रीतुन बाहेर पडून स्वयंमपुर्ण होवून दुस-या कृषी क्रांतीच्या उंबरठ्यावर आहे. मागसलेला भारत हा आज औद्योगीक राष्ट्र म्हणुन मान्यता प्राप्त झाला बहुसंख्य निरक्षर असलेला भारत साक्षरतेचे अनेक सोपान चढून ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अग्रनी बनला. उद्योग व्यवसाय, वाहतुक, इत्यादी क्षेत्रात भारताची पत सातत्याने वाढत आहे. राहणीमानाचे स्तर सुधारले तर जीवनमान वाढले. भारतीय शासन व प्रशासनाची पारदर्शकता वाढीला लागली. माहीतीच्या अधिकाराने भारतीयांमध्ये आत्मवीश्वासाची जाणीव वाढली. पंचायत राज व्यवस्थेने भारतीय लोकशाहीला अन्य देशवासी नागरीकांचे शासनात सहभाग व महीलांना सत्तेत वाटा ही इतर राष्ट्रांसाठी स्वप्नवत वाटणारी तत्वे भारताने सत्यात उतरवीली.

भारतीय लोकशाही व लोकशाहीचे व्यवस्थेचे मुल्यांकन करतांना खालील परीनामांना ती कशी सामोरे गेली ते पुढील प्रमाणे.

१) जग हे जरी ओंतरराष्ट्रीय सीमांनी राज्यांमध्ये विभाजीत झालेले असले तरी ते एक आहे ही जाणीव ठेवणे २१ साव्या शताब्दीतील महाशक्तीला बंधनकारक असेल .
२) महाशक्तीचे नागरीक सुशिक्षीत व अन्य राज्यातील नागरीकाप्रती सहानुभूतीपुर्वक व्यवहार ठेवणारे असावेत
३) अत्यंत प्रगत विज्ञान व तंत्रज्ञान हाताळण्याची क्षमता नसेल अशा राज्यांना ते हस्तांतरीत करु नये.

वरील परीणामाला भारतीय लोकशाही कशा पध्दतीने सामोरे गेली हे आपण पुढील परीनामानुसार तपासुन
१.भारतीय संस्कृतीने जगाला वसुंधरा म्हणुन संबोधीले वसुंधरा या या संबोधनातील गोडवा व आत्मीयता ही जगातील सर्व देशातील वैशीष्ट्यपुर्ण भुभागाला समप्रमाण लागु पडते. राष्ट्रासाठी जन्म मरण आहे तर राज्यासाठी ते सतत प्रगत होत आहे. ते जगत आहे ही संज्ञा

वापरली जाते. हेच अस्तीत्व आणि अस्तीत्वास अधिक चांगल्या प्रकारे जगता येईल अशा स्वरुपात ते भवीष्यातील वर्तमानाला सोपवीण्याची क्षमता भारतीय व्यवस्थेत आहे का त्याचे उत्तर निश्चीतच आहे कारण भारतीय शासन व्यवस्थेतील सर्वोच्च अशा पदावर अे.पी.जे. अब्दुल कलाम माजी राष्ट्रपती, डॉ. मनमोहनसिंग माजी प्रंतप्रधान आणि श्री नरेंद्र मोदी ,प्रधानमंत्री भारत सरकार

२. भारतीय लोकशाही व्यवस्थेने अज्ञानाला झुगारुन ज्ञानाची वाट हाताळली

वैज्ञानीक दृष्टीकोनाला जनसाधारणांनी मास एज्युकेशन सिस्टीम अंगीकारली शिक्षणाला कान्याको-यात पोहचवीले. उच्च शिक्षणाची तरतुद केली, विद्यापीठे, संशोधन केंद्रे, नवीन ज्ञान निर्मीतीचे तीर्थक्षेत्र ठरली. भारत हे बुध्दीनीसारनाचे केंद्र बनले होते ते विद्यवत्तेचे भांडार बनले आहे. जगभर भारतीयतेची ओळख सन्मानाने केली जाते. जगातील असा कोणताही देश नाही जीथे भारतीय नाही अनेक देशाच्या व्यवस्थेतील उपव्यवस्था ह्या भारतीयांच्या मदतीने स्थापीत करुन संचालीत केले जातात आणि अशी राज्ये भारतीयांना उपकृत केली आहे. व त्यातुन त्या त्या देशवासीयांच्या भारतीयांप्रती बंधुभाव अस्तीत्वात आला आहे.

३.अत्यंत प्रगत विज्ञान व तंत्रज्ञान जी एकवीसाव्या शतकात महाशक्ती निर्धारीत करणारे एक परीमान राहील ते साधना-या राज्याने अन्य राज्यांना त्यांचे तांत्रीक ज्ञान देवू नये कारण हे विज्ञान व तंत्रज्ञान अपरीमीत संपन्नता व शक्तीचे आद्यस्त्रोत होय. न्यानो टेक्नॉलॉजीची पहीली संशोधन संस्था भारतात जुन २००५ मध्ये दिल्लीत स्थापन करण्यात आली. जगात केलेली न्यानो टेक्नॉलॉजी संशोधन संस्था केवळ अमेरीका, जपान, युरोपीयन युनियन व भारताजवळ आहे. व आज हे चारच २१ व्या शताब्दातील महाशक्ती बनण्याच्या स्पधेत आहे. या चारपैकी जो टेक्नॉलॉजी ला इंडस्ट्रीत रुपांतरीत करेल तो एकवीसाव्या शतकात महाशक्ती बनेल .

भारतीय लोकशाही व्यवस्थेचे जेंव्हा आपण तंत्रज्ञानाच्या संदर्भात अध्ययन करतो तेंव्हा २८ तंत्रज्ञानात त्याला महत्व प्राप्त होते. न्युक्लीयर, ओषन, स्पेस, इलेक्ट्रानिक, कॉम्प्युटर, ॲग्रीकल्चर, मेडीसीनल, ॲरोनॅटीकल, मिसाईल इत्यादी टेक्नॉलॉजीत तो अग्रगणी भाग आहे.

भारतीय लोकशाही व्यवस्थेपुढील ही जी समस्येच्या स्वरुपात आवाहने आहेत त्याचे निराकरण हे समस्या ज्या अभावात जनमलेली आहे. त्याचे निर्मुलन करण्यात आहे. अभावाचे निर्मुलन म्हणजे प्रत्येक नागरीकाच्या आवश्यकतेची पुर्ती, आवश्यकते एवढा पुरवठा नाही जी इतकी उणीव आहे. ती आपल्या वाट्याला येवू नये म्हणुन दबाव गटा द्वारे राजकारण खेळले जाते. राजकारणासाठी कशाचाही उपयोग करावा. नीती बरोबर अनितीचा उपयोग राजकारणाला कलोशीत करण्यास कारणीभुत झाले आहे. सत्तेचा मार्ग मतपेटीतुन जातो. निवडणुका ह्या निर्णायक ठरण्यामुळे निवडणुकीत जिंकने हे राजकारणाचे ध्येय

झाले आहे आणि त्यासाठी व्यक्तीगत प्रभाव ते धर्मापर्यंतचा उपयोग राजकारणात केला जातो. आणि विभीन्न समस्या अस्तत्वात येतात. समस्या आणि त्याचा राजकारणीद्वारे स्वार्थ साधण्यासाठी चळवळीत रुपांतर हे सर्व साधारणांना भ्रमात टाकत असते अशा भ्रमामुळे लोकशाही ग्रशीत झाली आहे. समस्या तीचे स्वरुप वर्तमानातील तीचे परीनाम हे कमी करण्यासाठी ताबडतोब उपाययोजना आणि समस्येचे निराकरण करण्यासाठी दिर्घकालीन उपाययोजना आखने यासाठी सुजान व सुशिक्षीत नागरीक घडवीणे व त्यास बुध्दीप्रामाण्यवादी युक्त बनवीने आवश्यक आहे. उदा. लोकसंख्येचा स्पोट जन्मदर कमी झाला आहे. मृत्यु दर वाढत आहे आणि लोकसंख्येचे जे संकट राजकारणी आपल्या भाषणातुन दर्शवीतात ते कसे असत्य आहे याची जाणीव सर्व साधारण जनतेला होईल. यासाठी राज्य शास्त्राच्या कोणत्याही शाखेत संशोधन करावे ही आजच्या भारतीय लोकशाहीची गरज आहे.

संदर्भ -

१) भारतीय लोकशाही गणराज्य, देवरे, विस्पुते, निकुंभ, प्रशांत पब्लीकेशन, जळगांव, २०१२.
२) भारतीय राज्यशासन, वा.घा. पाटील, पिंपळापुरे प्रकाशन जळगांव, २०१२
३) भारतीय शासन व राजकारण, भा.ल.भोळे, पिंपळापुरे प्रकाशन जळगांव
४) भारतीय संविधान सुरेंद्र मोरे प्रशांत पब्लीकेशन जळगांव २०१३
५) भारतीय संविधान विजय कुलटे, प्रशांत पब्लीकेशन जळगांव २०१३
६) भारतीय शासन व राजकारण, राजलोटे पिंपळापुरे प्रकाशन नागपूर २००३